# स्त्री शिक्षण सद्स्थिती, समस्या व उपाययोजना

**प्रा.डॉ. वैजयंता एन. पाटील**
संचालिका, शिक्षणशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**स्वाती नामदेवराव झंपलवाड**
संशोधक विद्यार्थींनी, शिक्षणशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**प्रस्तावना :-**

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. परंतू या प्रक्रियेत निरंतर बदल होत असतो. पुर्वी शिक्षण या शब्दाचा अर्थ शिकणे किंवा अभ्यास करणे विद्यापीठात जाऊन परिक्षा उतीर्ण होणे अशा गृहीत धरला जात होता. परंतू आता शिक्षणाची संकल्पना बदलला आहे. नव्हे तर विस्तुत झाली आहे.

आज शिक्षणाचा अर्थ फक्त अभ्यासक्रम नव्हे तर अभ्यासक्रमाबरोबर अभ्यासानुवर्ती उपक्रम सुद्धा आहे. शिक्षण म्हणजे फक्त जानात्मक विकास नव्हे तर बोधात्मक व क्रियात्मक विकास होय.

अभ्यासनुवर्ती उपक्रमामुळे विद्यार्थीचा व्यक्तिमत्व विकास अर्थात सर्वागीण विकास होत असतो. संस्कारक्षम वयातील विद्यार्थ्यांवर अभ्यासानुवृती उपक्रमाद्वारे योग्य संस्कार करता येतात. या संस्कारामुळे उत्कृष्ठ व्यक्तिमत्वाचे नागरिक तयार करणे. हे शिक्षणाचे उद्दीष्टये साध्य होते.

जर विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक उपक्रमाबाबत प्रेरणेचा आभाव जाणवला तर विद्यार्थ्यांच्या विकासात आडथळा येऊ शकतो. विद्यार्थ्यांचा विकास कमी प्रमाणात होतो.

सांस्कृतिक उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. विद्यार्थी आपले विचार व्यक्त करायला शिकतो. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणाला वाव मिळतो. पण जर विद्यार्थी सांस्कृतिक उपक्रमात भाग घेत नसेल तर त्याचा आत्मविश्वास कमी होतो. विचार व्यक्त करण्यासाठी त्याला भिती वाटते. विद्यार्थ्यांच्या विकासला चालना मिळत नाही.

**संशोधनाची गरज :-**

मानवी जीवनाला आवश्यक असणाऱ्या सद्गुणाचे रोपन करण्यासाठी संस्कार करावे लागतात हे संस्कार सतत वेळोवेळी करावे लागतात. संस्काराचा संबंध भावना व कृती यांच्याशी असतो. व्यक्तिने निर्मिण केलेले सामाजिक संबंधात संस्कार महत्वपुर्ण ठरतात कोणत्या भावणेणे कोणती कृती घडली यांचा विचार संस्कारातुन होतो.

संस्काराची जपणुक सांस्कृतिक उपक्रमातुन होते. पण सांस्कृतिक उपक्रम राबविण्यासाठी प्रेरणा महत्वपुर्ण आहे. विद्यार्थीमध्ये सांस्कृतिक उपक्रम राबविण्याबाबत प्रेरणेचा आभाव आहे का? ते प्रोत्साहीत होऊन हे कार्य करतात. की नाही प्रेरणेचे कार्य काय या गोष्टीचा शोध घेण्यासाठी संशोधनाची गरज आहे.

**संशोधनाचे महत्व :-**

सांस्कृतिक उपक्रम म्हणजे अभ्यासनुवर्ती उपक्रमात समाविष्ठ होणारा एक घटक आहे. सांस्कृतिक उपक्रम केवळ उपक्रम म्हणुन चालणार नाही तर सांस्कृतिक उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांचा सर्वागीण विकास होण्यास मदत होते. या उपक्रमामुळे शिक्षण प्रभावी होण्याची शक्यता असते.

विद्यापीठ स्तरावर घेतले जाणारे उपक्रम म्हणजे सण उत्सव सांस्कृतिक उपक्रम आहेत. सदरील उपक्रम विद्यापीठ स्तरावर राबविल्यास विद्यार्थीमध्ये निश्चितच विकास साधला जाणार आहे.

विद्यापीठ स्तरावर अभ्यासानुवर्ती उपक्रम राबविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणेचा आभाव जाणवतो का? प्रेरणेच्या आभावामुळे सांस्कृतिक उपक्रम राबविण्यासाठी अडचणीचा शोध घेणे महत्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दीष्टये :-**

१. सांस्कृतिक उपक्रमाबाबत अधिक माहिती मिळवणे.

२. सांस्कृतिक उपक्रमात भाग घेतलेल्या विद्यार्थीमधील बद्दल अभ्यासणे.
३. विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमाच्या शाखेच्या विद्यार्थीचा सांस्कृतिक उपक्रमाबाबत कल / आवड / मत अभ्यासणे.
४. विद्यापीठातील विद्यार्थीमध्ये सांस्कृतिक उपक्रम राबविण्या बाबत प्रेरणेचा आभाव अभ्यासणे.

**व्याप्ती / मर्यादा :-**

हे संशोधन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपूरी नांदेड या विद्यापीठातील संकूला संबंधीत असुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वषी पुरते संबंधीत आहे.

संकुलाशी संलग्नीत अभ्यास केंद्राचा विचार केला जाणार नाही.

**जनसंख्या / न्यादर्श / नमुना निवड :-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील सर्व संकुलातील एकुण विद्यार्थीपैकी संशोधिकेने न्यादर्श म्हणुन तीन शाखामधील ९० विद्यार्थीची सहेतुक नमुना निवउ पद्धतीने निवड केली.

**संशोधनाची साधने :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली साधनाची निवड केली आहे.

**निष्कर्ष :-**

१. सांस्कृतिक उपक्रमातुन विद्यार्थीचा सर्वांगीण विकास होतो.
२. सांस्कृतिक उपक्रमात आवश्यक साहीत्य बहुतांश वेळा विद्यापीठाद्वारे उपलब्ध करुन दिले जाते.
३. सांस्कृतिक उपक्रमात प्रामुख्याने अभिनय, नृत्य गीतगायन, काव्यवाचन, रांगोळी अशा विविध कला प्रकारांचा समावेश करण्यात येतो.
४. विद्यापीठ स्तरावरील सांस्कृतिक उपक्रमाच्या आयोजनाचा सर्व आर्थिक भार विद्यापीठ उचलते.
५. सांस्कृतिक उपक्रमांना प्रमुख पाहुणे म्हणुन समाजातिल प्रतिष्ठित व्यक्तिना तसेच विविध कलाकारांना बोलवण्यात येते.
६. विद्यापीठातील सांस्कृतिक उपक्रमाचे आयोजन विद्यार्थी कल्याण विभागामार्फत केले जाते.
७. सांस्कृतिक उपक्रमात भाग घेणाऱ्या विद्यार्थीमध्ये थोडया प्रमाणात प्रेरणेचा आभाव जाणवला.
८. सांस्कृतिक उपक्रमात भाग घेण्यासाठी पालकांचा विरोध असल्यामुळे विद्यार्थीना अडचणी येतात.
९. सांस्कृतिक उपक्रमामुळे विद्यार्थीमध्ये सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसुन येते.
१०. सांस्कृतिक उपक्रमामध्ये जे विद्यार्थी भाग घेत नाहीत त्याचा सर्वांगीण विकास काही प्रमाणात कमी जाणवतो.

**संशोधनासाठी उपाय योजना :-**

१. सांस्कृतिक उपक्रमात सहभागासाठी विद्यार्थीना प्रेरणा दयावी.
२. सांस्कृतिक उपक्रमातील सहभागासाठी विद्यार्थीना बक्षिसे दयावीत.
३. सांस्कृतिक उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठाने आर्थिक मदत करावी.
४. सांस्कृतिक उपक्रमाबाबत प्रोत्साहीत करण्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम ठेवावेत.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**

१. आगलावे प्रदिप ( २००२) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्र, नागपूर विद्या प्रकाशन.
२. काचोळे के.वि. (१९८८) समाजशास्त्रीय तत्त्वे व पद्धती नागपूर. श्री. मंगेश प्रकाशन.
३. संस्कृती पुजन.